महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठामध्ये डॉ.आप्पासाहेब पवार यांची जयंती उत्साहात

**कोल्हापूर, (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ.आप्पासाहेब पवार यांची जयंती आज विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रथम कुलगुरू डॉ.आप्पासाहेब पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.



यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ.श्रीकृष्ण महाजन, डॉ. सी.एच.भोसले, डॉ. सी. एच. पवार, डॉ.तानाजी चौगले, डॉ.शरद बनसोडे, विद्यार्थी भवनचे रेक्टर डॉ.दिपक भादले, डॉ.मिना पोतदार, डी. बी. साबळे, डॉ.माधुरी वाळवेकर, पवन कांबळे, श्रुतिका निकाळजे, विद्यार्थी भवनचे आजी माजी विद्यार्थी आणि प्रशासकीय सेवक, अधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road, Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# वंचितांच्या ज्ञानवर्धनासाठी आधुनिक प्रयत्न आवश्यक: खासदार शाहू छत्रपती

## ब्रेल लिपीमधील पहिल्या शाहूचरित्र पुस्तिकेचे विद्यापीठात प्रकाशन

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज):**

दृष्टीहीन तसेच वंचित घटकांच्या ज्ञानवर्धनासाठी आधुनिक पद्धतीने प्रयत्न करणे आवश्यक आहेत. त्यासाठी समाजाने पुढे येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी आज येथे केले.

राजर्षी शाहू महाराज स्मृतिदिन प्रसंगी शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित विक्रम रेपे संकल्पित 'राजर्षी शाहू महाराज ब्रेल पुस्तिके'च्या प्रकाशन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ब्रेल लिपीमध्ये प्रकाशित होणारे हे पहिलेच शाहूचरित्र आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

खासदार श्रीमंत शाहू महाराज म्हणाले, विक्रम रेपे आणि त्यांच्या मित्र परिवाराने सामाजिक जाणीवेच्या भावनेतून अंध व्यक्तींपर्यंत शाहू महाराजांचे जीवनकार्य पोहोचविण्यासाठी केलेला ब्रेल पुस्तिकेचा प्रयत्न अनुकरणीय आहे. त्यांच्याप्रमाणे इतर समाजघटकांनीही वंचितांच्या सक्षमीकरणासाठी पुढे येणे अपेक्षित आहे. अंध विद्यार्थ्यांना विविध विषयांतील ज्ञान देण्यासाठी अशा अनेकानेक उपक्रमांची आवश्यकता आहे. त्यांच्यासाठी ऑडिओबुक्सही करता येऊ शकतील. आजघडीला समाजात अंधांची संख्या लक्षणीय आहे. त्यांना दृष्टी प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेतच, त्याच बरोबरीने अंध अवस्थेचे मानवी जीवनातून निर्मूलन करण्यासाठी आधुनिक संशोधन करण्याचीही आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, राजर्षी शाहूंचे जीवनकार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रामार्फत भरीव कार्य झालेले आहे. विद्यापीठात दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी स्थापित केंद्रामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतात. दृष्टीहीन व्यक्तींपर्यंत राजर्षी शाहूंचे कार्य पोहोचविण्याच्या दृष्टीने ब्रेल पुस्तिकेचा उपक्रम अत्यंत उपयुक्त सिद्ध होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.



कोल्हापूर पुरालेखागाराचे अभिलेखाधिकारी गणेशकुमार खोडके म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, शैक्षणिक यांसह सर्वच क्षेत्रांतील कार्य महान आहे. त्यांनी राबविलेल्या अनेक उपक्रमांची माहिती आजही लोकांना नाही. महाराजांनी हत्तींची पैदास करण्यासाठी खास निर्माण केलेले शिवारण्य, चहा-कॉफीच्या मळ्यांचा यशस्वी प्रयोग, संस्थानात ठिकठिकाणी उभारलेली अंबाबाईची मंदिरे आदी बाबी अज्ञातच आहेत. महाराजांचा वारसा सांगत असताना आपण त्यांचे चरित्र अंगिकारणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी शाहू महाराजांच्या चरित्राचा व कार्याचा सविस्तर वेध घेतला. ते म्हणाले, शाहू महाराज हे प्रत्येक नागरिकाला एक वेगळी जीवनदृष्टी प्रदान करणारे व्यक्तीमत्त्व आहे. दीनदुबळ्यांना माणुसकीची वागणूक देणारे आणि सर्वंकष मानवी विकासाची नवी परिभाषा निर्माण करणारे शाहू महाराज होते. महाराजांच्या जीवनचरित्रामधून सातत्याने विकासाची नवी दृष्टी मिळत राहते.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदैव सहानुभूतीचा दृष्टीकोन बाळगला आहे. विशेषतः दृष्टीहीन व्यक्तींसाठी रिसोर्स सेंटर फॉर व्हिज्युअली चॅलेंज्ड या केंद्रामार्फत त्यांच्यासाठी अनेकविध उपक्रम राबविले जातात. अंध विद्यार्थी हे प्रयोगपद्धतीमुळे विज्ञानाच्या शिक्षणापासून वंचित राहतात. ही बाब लक्षात घेऊन वैज्ञानिक प्रयोग कसे करावेत, यासाठीचे प्रशिक्षण शिबीरही विद्यापीठ घेते. अंध विद्यार्थ्यांना बुद्धीबळाचे प्रशिक्षण देऊन असे दहा विशेष संचही त्यांना प्रदान केले आहेत. आता लवकरच त्यांच्या स्पर्धा भरविण्याचाही मानस आहे. या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव असणारे आपले विद्यापीठ राजर्षी शाहूंचे विचार व कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी प्रतिबद्ध आहे. डॉ. विलास संगवे यांच्यापासून ते डॉ. जयसिंगराव पवार यांच्यासारख्या ध्येयनिष्ठ संशोधकांनी विद्यापीठाच्या माध्यमातून शाहूचरित्राचे अनेक पैलू समाजासमोर आणण्याची मोलाची कामगिरी केली आहे.

यावेळी खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे कार्यक्रमास उपस्थित असलेल्या काही अंध विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात त्यांच्या हस्ते पुस्तिका प्रदान करण्यात आली. इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन विक्रम रेपे यांनी केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, वसंतराव मुळीक, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. नमिता खोत, डॉ. मंजुश्री पवार, डॉ. सुरेश शिखरे, डॉ. सचिन पवार, 'नॅब'चे एम. बी. डोंगरे, भाग्यश्री प्रकाशनाच्या भाग्यश्री कासोटे -पाटील, डॉ. प्रतिभा देसाई, उज्ज्वल नागेशकर, सचिन शानबाग, विक्रम जरग यांच्यासह विविध अंध शाळांचे संचालक, शिक्षक, पालक, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पुस्तिकेचे राज्यातील सर्व अंधशाळांमध्ये वितरण

आज प्रकाशित करण्यात आलेल्या शाहूचरित्राच्या ब्रेल पुस्तिकेचे मुद्रक स्वागत थोरात यांच्याकडून येत्या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील सर्व अंधशाळांमध्ये वितरण करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पुस्तिकेचा हिंदी व इंग्रजीमध्ये अनुवाद करण्याचाही मानस संकल्पक विक्रम रेपे यांनी यावेळी व्यक्त केला.

महा न्यूज & व्ह्यूज




# शिवाजी विद्यापीठात नॅनोसायन्स व टेक्नोलॉजी अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या विभागात विद्यार्थ्यांना बी.एस्सी. - नॅनो सायन्स व तंत्रज्ञान या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्याची मोठी संधी उपलब्ध असून बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या आधुनिक शिक्षण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

डॉ. शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्या विद्यार्थ्यांना आपल्या बुद्धीला चालना देऊन शास्त्र व तंत्रज्ञान (सायन्स अँड टेक्नॉलॉजी) यामध्ये आव्हानात्मक करिअर करायचे आहे अशा विद्यार्थ्यांसाठी 'नॅनो सायन्स व नॅनो टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून एक सुवर्णसंधी उपलब्ध आहे. संशोधन, उद्योजकता आणि विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयय स्तरावरील कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळवण्यासाठी हे एक उत्तम क्षेत्र आहे.

या नाविन्यपूर्ण व प्रगतशील क्षेत्रांमध्ये करिअर घडवण्यासाठीचे आवश्यक शिक्षण हे विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर करता येऊ शकते. त्यामध्ये बॅचलर ऑफ सायन्स (B.Sc.), मास्टर्स ऑफ सायन्स (M.Sc.), B.Sc.-M.Sc. इंटिग्रेटेड, आणि बॅचलर ऑफ टेकनॉलॉजी (B.Tech), यासारखे अभ्यासक्रम आपल्या देशातील निवडक विद्यापीठांमध्ये उपलब्ध आहेत. या पुढील Ph.D. पर्यंतचे शिक्षण आणि पोस्टडॉक्टरल फेलोशिप व संशोधनासाठी भारत व भारताबाहेर अमर्यादित संधी उपलब्ध आहेत.

याच्याशी संबंधित अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे उपलब्ध असून स्कूल ऑफ नॅनोसायन्स व नॅनोटेक्नोलॉजी या अधिविभागमध्ये बी.एस्सी. -एम.एस्सी. नॅनोसायन्स व नॅनोटेक्नोलॉजी (इंटिग्रेटेड) या प्रोग्रॅम साठी प्रवेश प्रक्रिया चालू झाली आहे. तरी विज्ञान शाखेतून १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी, हे एक उत्तम संधी असून त्याचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागाचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे. त्याचप्रमाणे बी.एस्सी रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र उत्तीर्ण विद्यार्थी एम-एस्सी नॅनोसायन्स व नॅनोटेक्नोलॉजीसाठी प्रवेश घेऊ शकतात. आजपर्यंत या अधिविभागातून अनेक विद्यार्थ्यांनी पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले असून ते संशोधन, उद्योजकता तसेच शासकीय व खाजगी कंपन्यांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत.

महा न्यूज & व्ह्यूज




# विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनास एक लाखाचे अक्षयदान



**कोल्हापूर, (महा न्यूज अ‍ॅण्ड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या नुतन इमारत बांधकामासाठी दिगंबर जैन बोर्डिंगचे सुरेश रोटे यांनी रूपये एक लाखाची देणगी अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर दिली. तसेच, कोल्हापूरातील आनंद यात्री ग्रुपचे आप्पासाहेब इनामदार यांनी देखील अक्षयदान भगवान महावीर अध्यासनास दिले. सदर बहुत देणगी बद्दल कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के, डॉ.प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ.विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील यांनी अभिनंदन केले.

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# छत्रपती शाहू महाराजांच्या स्मृतींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज):**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज शिवाजी विद्यापीठात राजर्षींच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले.



आज सकाळी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्रामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. दत्ता मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, डॉ. किशोर खिलारे, अविनाश भाले, सचिन घोरपडे आदी उपस्थित होते.


लोकमत

# राजर्षींचा जीवनपट ब्रेल लिपीत, पुस्तिकेचे आज होणार प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अंध व्यक्तींसाठी मैलाच्या दगड ठरलेल्या ब्रेल लिपीमध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनपटावर आधारित छपाई केलेली पहिलीच पुस्तिका कोल्हापुरात राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथीनिमित्त प्रकाशित होत आहे. कोल्हापुरातील दोन शाळांच्या माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक भान राखत मदत स्वरूपात जमा केलेल्या रकमेतून या पुस्तिकेचे मुद्रण केले आहे.

शिवाजी विद्यापीठात खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते आज, मंगळवारी व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात सायंकाळी ४.३० वाजता या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास विभागप्रमुख अवनिश पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित राहतील. या पुस्तिकेची संकल्पना राजर्षी शाहू विचार अभ्यासक विक्रम रेपे यांची आहे. ब्रेल लिप्यंतर आणि मुद्रण रायगड येथील स्वागत थोरात यांनी केले आहे. मजकूर निवड व पडताळणीसाठी पुराभिलेख अधिकारी गणेशकुमार खोडके यांचे विशेष सहकार्य लाभले.




पुस्तिकेसाठी कोल्हापुरातील न्यू कॉलेजच्या इयत्ता बारावीच्या २००६ च्या वाणिज्य शाखेचे, तसेच देशमुख हायस्कूलच्या इयत्ता दहावीच्या २००४ च्या तुकडीचे सहकार्य लाभले आहे. राज्यातील महत्त्वाच्या अंध संस्था, तसेच शाळा आणि महाविद्यालयांत या पुस्तिकेचे मोफत वितरण करण्यात येणार आहे. प्रकाशन समारंभासाठी अंध व्यक्तींसाठी कार्यरत संस्था, इतिहास अभ्यासक शाहू प्रेमी यांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लोकमत

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती सोमवारी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. सी. एच. पवार, डॉ. तानाजी चौगले, डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी भवनचे रेक्टर डॉ. दीपक भादले, आदी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : 'पोलिस प्रशासन व नागरिक सेवा' पुस्तकाचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर.

# 'पोलिस प्रशासन, नागरिक सेवा पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठात सुजित मुंढे लिखित 'पोलिस प्रशासन व नागरिक सेवा' पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले.

प्र-कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, विधी अधिविभाग प्रमुख डॉ. व्ही. वाय. धूपदाळे, 'रासेयो' संचालक डॉ. तानाजी चौगले, सुदर्शन देसाई आदी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'समाजात कायद्याचे महत्त्व, त्याचे आकलन आणि अंमलबजावणी या प्रक्रियेत जनतेचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. फक्त फौजदारी नव्हे, तर शैक्षणिक, प्रशासकीय आणि सामाजिक कायद्यांचासुद्धा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे.' मुंढे म्हणाले, 'पोलिस प्रशासन आणि नागरिकांमधील संबंध प्रभावी होण्यासाठी कायद्याची सुलभ माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.'

06 MAY 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू निवडीची प्रक्रिया सुरू

## समिती सदस्यासाठी अधिकार मंडळांनी तीन नावे सुचविली

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता.५ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवडीच्या प्रक्रियेचे बिगुल वाजले आहे. कुलपती कार्यालयाच्या निर्देशानुसार कुलगुरू शोध समितीवर एका सदस्याचे नामनिर्देशन करण्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन आणि विद्या परिषद या अधिकार मंडळांनी तीन नावे विद्यापीठाला सुचविली आहेत. त्यात प्रा. सुहास जोशी, व्ही. रामगोपाल राव आणि राजीव आहुजा यांचा समावेश आहे.**



सध्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कालावधी सहा ऑक्टोबर रोजी संपणार आहे. त्यापूर्वी नवीन कुलगुरू निवडीसाठीची प्रक्रिया कुलपती कार्यालयाने सुरू केली आहे. कुलगुरू निवडीसाठी कुलपती कार्यालयास योग्य नावाची शिफारस करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम अकरा (तीन) नुसार कुलगुरू शोध समितीवर विद्यापीठाने एका व्यक्तीचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करावयाचे असते. त्यासाठी विद्यापीठ कायद्यानुसार या समितीवर व्यवस्थापन परिषद आणि विद्या परिषद या अधिकार मंडळांनी एकत्रित एका सदस्याचे नामनिर्देशन करून द्यावयाचे आहे.

त्याबाबत कुलपती कार्यालयाने विद्यापीठाला २० मार्च रोजी पत्राद्वारे निर्देश दिले होते. त्यानुसार आज व्यवस्थापन आणि विद्या परिषदेची बैठक झाली. त्यामध्ये तीन व्यक्तींच्या नावांची निवड करण्यात आली. त्यात आयआयटी इंदोरचे संचालक प्रा. सुहास जोशी, बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स पिलानीचे कुलगुरू प्रा. व्ही. रामगोपाल राव आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी रोपरचे संचालक राजीव आहुजा यांच्या नावाचा समावेश आहे.

या तिघांपैकी प्रा. जोशी यांच्या नावाची पहिल्या क्रमांकाची, तर प्रा. राव आणि आहुजा यांच्या नावाची अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांकावर शिफारस केली आहे.

### तीन नावे का सुचवली?

■ कुलगुरू शोध समितीवर एका व्यक्तीचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करायचे असते. मात्र, एका व्यक्तीचे नाव सुचविले आणि त्यांनी काही तांत्रिक कारणामुळे स्वीकृती दिली नाही, तर अडचण निर्माण होऊ नये म्हणून व्यवस्थापन आणि विद्या परिषद अधिकार मंडळांनी तीन नावांची निवड केली आहे.

### स्वीकृतीनंतर कुलपती कार्यालयाला नाव पाठविले जाणार

■ कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, 'कुलगुरू शोध समितीवर एका सदस्याच्या नामनिर्देशनासाठी तीन व्यक्तींची नावे व्यवस्थापन आणि विद्या परिषदेने सुचविली आहेत. या व्यक्तींना अधिकार मंडळांनी दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार विद्यापीठाकडून त्याबाबत पत्र पाठविण्यात येईल. त्यापैकी स्वीकृती देणाऱ्या व्यक्तीचे नाव सदस्य म्हणून अधिकार मंडळांच्या मान्यतेने कुलपती कार्यालयाला पाठविले जाईल.'

सकाळ

# १२१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/ एप्रिलमधील उन्हाळी सत्रातील पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दोन एप्रिलपासून सुरू आहेत. आजअखेर बीए., बी.कॉम., बी.एस्सी., बीसीए, बीएबीएड्., बीआयडी, इंटिग्रेटेड बी.एड/एमएड, बीबीए, एमबीए, बॅचलर ऑफ लॉज्, एमए, एमएसडब्लू, एमकॉम, डिप्लोमा कोर्स इन जर्मन लँग्वेजीस्, एमआरएस, बी.आर्च, डिप्लोमा इन जॅपनीज् लँग्वेजीस्, सर्टिफिकेट कोर्स इन जर्मनी लँग्वेज् अशा विविध १२१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध २०४ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे झाल्या. परीक्षांसाठी ६१,९८५ विद्यार्थी उपस्थित होते. आज रोजी बी.ए. डिफेन्स् स्टडीज् सेमिस्टर ५ (कोर्स कोड ३१४५) आणि ६, बी.ए. डिफेन्स स्टडीज् सेमिस्टर ५ आणि ६ अशा चार अभ्यासक्रमांचे निकाल आज जाहीर झाले. आजअखेर ३९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 MAY 2025
तरुण भारत

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना जयंतीदिनी अभिवादन...



कोल्हापूर : प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. सी. एच. पवार, डॉ. तानाजी चौगले, डॉ. शरद बनसोडे आदी.

तरुण भारत

# भगवान महावीर अध्यासनाला एक लाखाची मदत

कोल्हापूर : भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारत बांधकामासाठी दिगंबर जैन बोर्डिंगचे सुरेश शहा यांनी १ लाख रुपयांची देणगी दिली आहे. तसेच कोल्हापुरातील आनंद यांनी सुमचे आप्पासाहेब इनामदार यांनी देखील भगवान महावीर अध्यासनाला देणगी दिली आहे. या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले आहेत.

जनसंपर्क कक्ष
06 MAY 2025
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डबल डिग्रीची वाढतेय क्रेझ


**शिवाजी विद्यापीठाने डबल डिग्री घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी मिळत आहे. शिवाजी विद्यापीठांतर्गत दरवर्षी अनेक तर या वर्षी ६०६ विद्यार्थी डबल डिग्री घेत आहेत. याचा फायदा विद्यार्थ्यांना नोकरीसाठी झालाच परंतू संबंधित विषयासाठी पुन्हा नव्याने तीन वर्षे वाया जात नाहीत. यामध्ये विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा, कष्ट आदींची बचतही होते. तसेच स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना फक्त आपल्या शाखेपुरते मर्यादित न राहता, बहुशाखीय ज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळते. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांमध्ये डबल डिग्री घेण्याची क्रेझ वाढत आहे.**

**• अहिल्या परकाळे, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सर्वच महाविद्यालय किंवा अधिविभागाच्या विद्यार्थ्यांना डबल डिग्री घेता येते. त्यामुळे एखाद्या सोशल सायन्स, भाषा, लॉ किंवा विज्ञान विषयाच्या विद्यार्थ्यांना दूरशिक्षणमधून बी.ए., बी.कॉम. आणि एम.ए., एम.कॉम., एमएस्सी गणितची पदवी घेता येते. यंदा एकाचवेळी दोन विषयांची पदवी ६०६ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली आहे. डबल डिग्री घेणाऱ्यांमध्ये लॉ (विधी) करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त म्हणजे २३० आहे. स्पर्धेच्या युगात जास्तीत जास्त शाखांचे ज्ञान आत्मसात करण्याकडे तरुणांचा ओढा आहे. कारण सध्या प्रत्येक क्षेत्रात आव्हाने असल्याने ही आव्हाने पेलण्यासाठी तरुणाई बहुशाखीय ज्ञान घेत आहे. स्पर्धेत उतरण्यापूर्वी संपूर्ण तयारीनिशी उतरलो तरच यश मिळेल याची विद्यार्थ्यांना खात्री आहे. त्यामुळे या ना त्या क्षेत्रात नोकरी किंवा व्यवसाय करण्याची संधी मिळावी म्हणून विद्यार्थी प्रयत्नशील असतात. म्हणूनच शिवाजी विद्यापीठ अंतर्गत डबल डिग्री घेण्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा आहे.

**लॉसह विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांची संख्या अधिक**

युजीसीच्या निर्देशानुसार डबल डिग्री घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा पेपर एकाचवेळी येत असेल तर दूरशिक्षणमधील विषयाचा पेपर क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांबरोबर घेतला जातो. कारण विद्यार्थ्यांना एकाचवेळी बहुशाखीय विषयाचे ज्ञान मिळावे यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील आहे. बहुशाखीय ज्ञान घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये लॉसह विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांची संख्या उल्लेखनीय आहे. कारण यातून ज्ञान तर मिळतेच परंतू नोकरीची संधी मिळण्यास अधिक मदत होते.




**डबल डिग्री घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत डबल डिग्री घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना एकाचवेळी बहुशाखीय अभ्यासक्रमाचे ज्ञान एकाचवेळी उपलब्ध होते. त्यामुळे डबल डिग्री घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा विभाग सर्वतोपरी मदत करते. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी डबल डिग्री घ्यावी.

**डॉ. अजितसिंह जाधव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन विभाग, शिवाजी विद्यापीठ.**

